**सोलापूर विद्यापीठ**
**परीक्षा विभाग**
सोलापूर पुणे नॅशनल हायवे, केंगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७-२७४४७७८
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac
ई-मेल: coesolapur@yahoo.in

**Solapur University**
**Examination Section**
Solapur-Pune National Highway,
Kegaon,
Solapur-४१३ २५५
EPABX No.- ०२१७-२७४४७७८,
Fax No.०२१७-२७४४७७०
Web Site : http://su.digitaluniversity.ac
email id: coesolapur@yahoo.in

**जा. क्र. सोविसो/परीक्षा/२०१४-१५/१४१७** **दि. ०७/१०/२०१४**

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. प्राचार्या/मा. संचालक**
सर्व कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालये

**विषय :** क्रेडीट/ग्रेडींग पध्दतीने जाहीर करावयाच्या निकालाबाबत.

संदर्भ : **१.** विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. सोविसो/अभ्यासमंडळे/२०१४-१५/५७८५ दि.३०/०८/२०१४
**२.** विद्यापीठ कार्यालयीन पत्र क्र. सोविसो/अमं/२०१४-१५/५९४४ दि.५/९/२०१४

**महोदय,**

विद्यापीठाने शै. वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेशित एफ.वाय.बी.ए./बी.एस्सी/बी.कॉम व विधी या वर्गास CGPA पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असल्याबाबत संदर्भीय पत्र क्र. १ व २ च्या अनुषंगाने कळविण्यात आलेले होते. CGPA पध्दत अंतर्गत प्रथम सत्राचे निकाल हे ग्रेडींग पध्दतीने जाहीर करण्यात येणार असून त्यासंबधीचा सविस्तर माहिती खालीलप्रमाणे असे.

१. गुणपत्रकात गुणांऐवजी श्रेणी [ग्रेड] दर्शविण्यात येणार आहे, विद्यार्थ्यांने १०० पैकी प्राप्त केलेल्या गुणांचे परीवर्तन हे ग्रेडमध्ये कशा पध्दतीने केले जाणार आहे या संबधीचा तक्ता खालीलप्रमाणे असेल.

**तक्ता -१**

**Conversion of Marks to Grades in 7 Point Credit System**

| Marks obtained Out of 100 | Grade | Grade Points |
|---|---|---|
| 75-100 | O : Outstanding | 06 |
| 65-74 | A : Very Good | 05 |
| 55-64 | B : Good | 04 |
| 50-54 | C : Average | 03 |
| 45-49 | D : Satisfactory | 02 |
| 40-44 | E : Pass | 01 |
| 00-39 | F : Fail | 00 FC (Failed in UA)<br>00 FR (Failed in CA) |

२. प्रत्येक विषयाची शिकविण्याची वेळ, पध्दत यानुसार विद्याशाखानिहाय व विषयनिहाय क्रेडीट पॉईट [Credit Point] ठरविण्यात आलेले आहेत. उदा. प्रथम वर्ष कला यास प्रत्येक विषयासाठी ०४ Credits, प्रथम वर्ष वाणिज्य यास ०४ Credits व प्रथम वर्ष विज्ञान ०५ Credits

३. प्रत्येक ग्रेडसाठी तक्ता-१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ग्रेड पॉईट [Grade Point] ठरविण्यात आलेले आहेत, ते गुणपत्रकावर देखील Grade Point या रकान्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

४. प्रत्येक विद्यार्थ्यांची संबंधित विषयाची प्रगती ही त्या विषयात मिळवलेले ग्रेड पॉईटवर ठरते. मिळविलेले ग्रेड पॉईट हे विषयाचे क्रेडीट X ग्रेडींग पॉईट या पध्दतीने काढले जातात.

५. ज्या विषयात विद्यार्थी उत्तीर्ण असेल त्याच विषयाचे ग्रेड पॉईटचा विचार पुढील निकाल जाहीर करतांना केला जात असतो.

६. उदा. एखाद्या विद्यार्थ्यास जर इंग्रजी या विषयास ६३ गुण प्राप्त असतील, तर वरील तक्ता क्र.१ नुसार त्यास B ग्रेड देण्यात येतील B ग्रेडसाठी ०४ ग्रेड पॉईट दर्शविलेले असल्याने व इंग्रजी विषयास जर ४ क्रेडीट असतील

तर अ.क्र. ४ नुसार या विद्यार्थ्यांन १६ ग्रेड पॉईंट प्राप्त केलेले आहेत असे समजण्यात येईल. [16 Grade Point Earned]

७. ज्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण आहेत त्या विषयाला F ग्रेड दर्शविण्यात येते, त्यासाठी ०० ग्रेड पॉईंट देण्यात येतात.

८. प्रथम वर्ष बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. या वर्गाचे पासींग ४० चे असल्याने बहि:स्थ (U.A.) परीक्षेत ७० पैकी २८ पेक्षा कमी व अंतर्गत परीक्षेत ३० पैकी १२ पेक्षा कमी गुण असल्यास विद्यार्थ्याला F ग्रेड देण्यात येते. विद्यापीठाच्या परीक्षेत २८ पेक्षा कमी गुण व अंतर्गत परीक्षेस जरी १२ पेक्षा जास्त गुण असले तरी विद्यार्थ्याला F ग्रेड देण्यात येईल. विद्यापीठाच्या परीक्षेत २८ पेक्षा जास्त व अंतर्गत परीक्षेत जर १२ पेक्षा कमी गुण असले तरी विद्यार्थ्याला F ग्रेड देण्यात येईल.

९. वरील तक्ता क्र. १ नुसार F ग्रेडसाठी ०० ग्रेड पॉईंट दिलेले असल्यामुळे विद्यार्थ्याला जरी १०० पैकी ३० गुण प्राप्त असतील तर मिळालेले ग्रेड पॉईट (Earned Grade Point) ०० दिसतात. ०० ग्रेड पॉईंट याचा अर्थ विद्यार्थ्याला ०० गुण मिळाले असा होत नाही. तर तो विषय अनुत्तीर्ण असल्यामुळे विद्यार्थ्याला परत द्यावयाचा आहे असा होतो.

१०. प्रत्येक सत्राच्या गुणपत्रकात त्या सत्राचा SGPA (Semester Grade Point Average) म्हणजे विद्यार्थ्याची त्या सत्राची सरासरी प्रगती दिलेली आहे ही प्रगती काढण्यासाठी खालीलप्रमाणे सूत्र वापरले जाते.

विद्यार्थ्याने त्या सत्रातील सर्व विषयात मिळवलेले एकूण ग्रेड पॉईंट

SGPA = -------------------------------------------------------

त्या सत्रासाठी पूर्ण करावयाचे एकूण क्रेडीटस्

११. विद्यार्थी त्या सत्रातील आवश्यक सर्व विषय उत्तीर्ण असेल तरच SGPA काढणेत येईल अन्यथा :SGPA:-- असा छापलेला असेल.

१२. विद्यार्थ्याची एखाद्या वर्गातील/अभ्यासक्रमातील प्रगती दर्शविण्यासाठी ज्याप्रमाणे शेकडा गुण व क्लास यांचा वापर केला जातो, त्याप्रमाणे या पध्दतीत विद्यार्थ्याची प्रगती CGPA (Cumulative Grade Point Average) व ग्रेड यांचा वापर केला जातो. CGPA हा वर्गातील/ अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याने एकत्रितरित्या मिळवलेल्या सर्व ग्रेड पॉईंटची सरासरी असते.

त्या वर्गात/अभ्यासक्रमात विद्यार्थ्याने प्राप्त केलेले एकूण ग्रेड पॉईंट (सर्व सत्रातील विषयांचे)

CGPA = -------------------------------------------------------

त्या अभ्यासक्रमासाठी असलेले एकूण क्रेडीटुझ्ं (सर्व सत्रांचे)

**तक्ता -२**

Conversion of total CGPA in to Grades

| CGPA | Grade |
|---|---|
| 5.50-6.00 | O : Outstanding |
| 4.50-5.49 | A : Very Good |
| 3.50-4.49 | B : Good |
| 2.50-3.49 | C : Average |
| 1.50-2.49 | D : Satisfactory |
| 1.00-1.49 | E : Pass |
| 0.00 -0.99 | F : Fail |

सबब, वरील माहितीचे अवलोकन करुन सदरची माहिती सर्व शिक्षक, शिक्षेकत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

**(भ. प्र. पाटील)**
**परीक्षा नियंत्रक**

**<u>प्रत माहितीस्तव :</u>**

१. मा. कुलगुरु कार्यालय, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
2. मा. कुलसचिव कार्यालय, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
3. परीक्षा विभागातील संबधित विभाग

## Sample format of Statement of Grade

Suppose student obtained following Marks

| Sem | Paper Code | Paper Name | Marks ( UA+CA) Out of 100 |
|---|---|---|---|
| **I** | **111101** | **English (Compulsory)** | **56** |
| | **111113** | **Marathi (Compulsory)** | **72** |
| | **111123** | **Marathi (Optional)-I** | **78** |
| | **111136** | **Economics (Optional)-I** | **59** |
| | **111137** | **Political Science (Optional)-I** | **42** |
| | **111135** | **Geography (Optional)-I** | **68** |
| | | | |
| **II** | **111101** | **English (Compulsory)** | **68** |
| | **111113** | **Marathi (Compulsory)** | **80** |
| | **111123** | **Marathi (Optional)-II** | **66** |
| | **111136** | **Economics (Optional)-II** | **73** |
| | **111137** | **Political Science (Optional)-I I** | **48** |
| | **111135** | **Geography (Optional)-II** | **59** |

Considering above marks and with reference to Table No 1 & Table No.2 in the Circular

Sample Format for CGPA System

# Solapur University, Solapur

## Statement of Grade for FYBA Exam

| | | | |
|---|---|---|---|
| Name of Student | xyz | Seat No | 123333 |
| College | abc | PRN | 33444444 |

| Sr No | Paper Code | Paper Name | Credits | Grade Obtained | Grade Points | Earned Grade Points |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 111101 | English (Compulsory) | **4** | **B** | **4** | **16** |
| 2 | 111113 | Marathi (Compulsory) | **4** | **A** | **5** | **20** |
| 3 | 111123 | Marathi (Optional)-I | **4** | **O** | **6** | **24** |
| 4 | 111136 | Economics (Optional)-I | **4** | **B** | **4** | **16** |
| 5 | 111137 | Political Science (Optional)-I | **4** | **E** | **1** | **4** |
| 6 | 111135 | Geography (Optional)-I | **4** | **A** | **5** | **20** |
| **Sem - I Status : Pass / Complete** | | **Credit : 24** | **EGP :** | **100** | **SGPA :** | **4.17** |
| 1 | 111101 | English (Compulsory) | **4** | **A** | **5** | **20** |
| 2 | 111113 | Marathi (Compulsory) | **4** | **O** | **6** | **24** |
| 3 | 111123 | Marathi (Optional)-II | **4** | **A** | **5** | **20** |
| 4 | 111136 | Economics (Optional)-II | **4** | **A** | **5** | **20** |
| 5 | 111137 | Political Science (Optional)-I I | **4** | **D** | **2** | **8** |
| 6 | 111135 | Geography (Optional)-II | **4** | **B** | **4** | **16** |
| **Sem - II Status : Pass / Complete** | | **Credits : 24** | **EGP** | **108** | **SGPA** | **4.5** |
| **Cumulative** | **Total Credits** | **48** | **Total EGP** | **208** | | |
| | **CGPA** | **4.33** | **Status : Pass/Complete** | | **Grade** | **B** |